**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**पीएम स्वनिधी योजना**

दिनांक ०९/०८/२०२१
जा.क्र. ७७०

**प्रेस नोट व मनपा सोशल मेडीयावर प्रसिद्धीसाठी**

**विषय : पीएम स्वनिधी योजनेंतर्गत SBI बँकेकडून कर्ज वितरण कार्यक्रम...**

केंद्र शासन पुरस्कृत 'पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी' योजना (पीएम स्वनिधी) नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरु आहे. या योजनेंतर्गत पथविक्रेत्यांनी कर्जाचे बँकेकडे २५०२७ ऑनलाईन अर्ज केलेले आहे. त्यापैकी बँकांकडून १३५९५ पथविक्रेत्यांना कर्ज मंजूर झाले आहे व त्यापैकी १२१९९ पथविक्रेत्यांना नाशिक शहरातील बँकांनी रक्कम रुपये १२ कोटी १४ लक्ष रुपयेचे कर्ज वाटप केलेले आहे. बँकांनी मंजूर केलेले परंतू कर्ज वितरीत न केलेले असे १३९६ प्रकरणे बँकेकडे प्रलंबित आहे. त्यामध्ये SBI बँकेकडे १२१४ प्रकरणे आहेत.

पीएम स्वनिधी योजनेंतर्गत एसबीआय बँकेकडे पथविक्रेत्यांनी ऑनलाईन ८९०४ प्रकरणे प्राप्त झालेले आहे. त्यापैकी ७७३५ प्रकरणे बँकेने मंजूर केलेले आहे व ६५२१ पथविक्रेत्यांना कर्ज वाटप केलेले आहे. परंतू कर्ज मंजूर केलेले पैकी १२१४ पथविक्रेत्यांना कर्ज वितरीत करणे SBI बँकेकडे बाकी आहे. या सर्व पथविक्रेत्यांना कर्ज वितरीत करणेसाठी मागील काही दिवसापासून SBI बँकेने सुरुवात केलेली आहे. कर्ज वितरण करणेसाठी बँकेने पथविक्रेत्यांना संपर्क केला असता काही पथविक्रेत्यांशी बँकेचा संपर्क झालेला नाही. त्यामुळे एसबीआय बँकेतून कर्ज न मिळालेल्या पथविक्रेत्यांना कर्ज वाटप करता येत नाही.

एसबीआय बँकेने पथविक्रेत्यांशी संपर्क न झालेल्या ३२६ लाभार्थीची यादी त्यांना संपर्क करणेकासाठी मनपाकडे दिलेलेली असून मनपाकडून या फेरीवाल्यांना फोनद्वारे कळविण्यात येत आहे. पथविक्रेत्यांनी बँकेत जातांना KYC दस्तऐवज त्यामध्ये ऑनलाईन भरलेला कर्ज अर्ज प्रस्ताव, मनपाने दिलेले शिफारस पत्र (LoR), बँकेचे पासबुक, मोबाईल, आधार कार्ड, मतदान कार्ड व रहिवाशी पुरावा इत्यादी कागदपत्र घेऊन पुढील २ ते ३ दिवसामध्ये बँकेत जावे असे एसबीआय बँकेने वरिष्ठ अधिकारी यांनी कळविले आहे.

पीएम स्वनिधी योजनेंतर्गत एसबीआय व इतर बँकेत अर्ज केलेल्या सर्व पथविक्रेत्यांनी पुढील २ ते ३ दिवसात आपले बँक खाते असलेल्या बँकेत जावे व जास्तीत जास्त लाभ पथविक्रेत्यांनी घ्यावा तसेच ज्या पथविक्रेत्यांना कर्ज मिळालेले आहे परंतू हप्ते भरलेले नाही अशा सर्व लाभार्थींनी वेळेत हप्ते भरावे असे आवाहान नाशिक महानगरपालिकेच्या उपायुक्त करुणा डहाळे यांच्याकडून करण्यात येत आहे.

तसेच पीएम स्वनिधी योजनेबाबत अधिक माहिती किंवा बाबत अडचण असल्यास आपल्या जवळच्या विभागीय कार्यालयाशी संपर्क करावा.

(करुणा डहाळे)
उपआयुक्त (अतिक्रमण)
नाशिक महानगरपालिका, नाशिक

प्रत कार्यवाहीस्तव
१) जनसंपर्क अधिकारी, नाशिक मनपा. यांचेकडे न्यूजपेपर वर प्रसिद्धीस्तव
२) संचालक,माहिती व तंत्रज्ञान विभाग, मनपा. यांचेकडे मनपा सोशल मेडीयावर प्रसिद्धीसाठी

Scanned with CamScanner